# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.05.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पाकिस्तानच्या कुरापतीना भारताचं चोख प्रत्युत्तर,
2. पाकिस्तानची आठ क्षेपणास्त्रं भारताकडून निकामी; घुसखोरीचा प्रयत्नही हाणून पाडला,
3. सरकारच्या दहशतवादविरोधी कृतीला सर्वपक्षीय बैठकीत संपूर्ण पाठिंबा,
4. अमेरिकेचे रॉबर्ट फ्रांसिस प्रिवोस्ट यांची नवे पोप म्हणून निवड आणि
5. खेलो इंडिया स्पर्धेत 55 पदकं पटकावत महाराष्ट्राचं पदकतालिकेतलं अव्वल स्थान कायम.

**<u>पाक क्षेपणास्त्रं</u>**

पाकिस्ताननं जम्मू आणि काश्मीरच्या सतवारी, सांबा, आरएसपुरा आणि आर्निया भागात आठ क्षेपणास्त्रं सोडली. मात्र हवाई संरक्षण विभागांनी सर्व क्षेपणास्त्रं वाटेतच अडवून निकामी केल्याचं संरक्षण दलाच्या सूत्रांनी म्हटलं आहे. जम्मू भागातली दृष्यं हमासनं इस्रायलवर केलेल्या हल्ल्याची तंतोतंत आठवण करून देणारी होती. पाकिस्तानी सैन्य एखाद्या दहशतवादी संघटनेप्रमाणे वागत आणि काम करत आहे, असंही या सूत्रांनी नमूद केलं.

पाकिस्तानची आयएसआय संघटना आणि हमासची गेल्या महिन्यात पाकव्याप्त काश्मीरमध्ये भेट झाली होती. आंतरराष्ट्रीय सीमारेषेनजीक असलेल्या जम्मू, पठाणकोट आणि उधमपूर भागांनाही पाकिस्ताननं लक्ष्य करत क्षेपणास्त्रांचा वापर केला. मात्र भारतीय सैन्यानं योग्य पद्धतीनं हल्ला परतवून लावला. त्यामध्ये कुठलीही हानी झाली नाही, अशी माहितीही संरक्षण सूत्रांनी दिली. दरम्यान रात्री 11 वाजण्याच्या सुमारास सीमा सुरक्षा दलानं जम्मू आणि काश्मीरमधील आंतरराष्ट्रीय सीमेला लागून असलेल्या सांबा भागात घुसखोरीचा मोठा प्रयत्न हाणून पाडला.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी काल संध्याकाळी त्यांचे अमेरिकी समपदस्थ मार्को रुबिओ यांच्याशी चर्चा केली. भारतानं सीमेपलीकडील दहशतवादाला लक्ष्यित आणि संतुलित प्रतिसाद दिला असल्याचं त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. तणाव निर्माण करण्याचा कोणताही प्रयत्न भारत खंबीरपणे हाणून पाडेल, असं डॉक्टर जयशंकर यांनी समाज माध्यमांवर लिहिलेल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात भारतासोबत काम करण्याबद्दलच्या अमेरिकेच्या वचनबद्धतेचं आपल्याला मनापासून समाधान असल्याचं त्यांनी पुढे म्हटलं आहे. जयशंकर यांनी सध्या सुरू असलेल्या घडामोडींबद्दल युरोपीय महासंघाच्या परराष्ट्र आणि सुरक्षा धोरण विभागाचे वरिष्ठ प्रतिनिधी काजा कल्लास यांच्याशीही चर्चा केली.

**<u>पत्रकार परिषद</u>**

22 एप्रिल रोजीचा पहलगाम दहशतवादी हल्ला हे सध्याच्या तणावाचं मूळ कारण आहे आणि भारत फक्त त्याला प्रत्युत्तर देत आहे, असं काल भारतातर्फे ठामपणे सांगण्यात आलं. काल नवी दिल्लीत परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि संरक्षण विभागाची संयुक्त पत्रकार परिषद झाली, त्यावेळी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी भारताची भूमिका स्पष्ट केली.

'तणाव वाढवण्याची भारताची इच्छा नाही, ऑपरेशन सिंदूरमध्ये केवळ दहशतवाद्यांच्या तळांना लक्ष्य करण्यात आलं, मात्र यापुढे पाकिस्ताननं काही आगळीक केली तर त्याला सडेतोड उत्तर दिलं जाईल', असं मिस्री म्हणाले.

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत पहलगाम दहशतवादी हल्ल्यावर चर्चा सुरू असताना द रेझिस्टन्स फ्रंट या दहशतवादी संघटनेचा उल्लेख करण्यास पाकिस्ताननं विरोध केला होता. या संघटनेनं उघडपणे हल्ल्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतरही पाकिस्ताननं विरोध केला, याकडे मिस्री यांनी लक्ष वेधलं. शेजारी देशाचे संरक्षणमंत्री आणि माजी परराष्ट्रमंत्री यांनीही दहशतवाद्यांना मदत करत असल्याचं कबूल केल्याचं सांगून दहशतवाद्यांच्या दफनविधीला पाकिस्तानचे सरकारी आणि लष्करी अधिकारी उपस्थित असल्याचं सिद्ध करणारी छायाचित्रं त्यांनी माध्यमांना दाखवली.

काल पाकिस्ताननं पूँछमधल्या गुरुद्वाराला आणि शीख समुदायाला हल्ल्याचं लक्ष्य केलं होतं, असं त्यांनी सांगितलं. या पत्रकार परिषदेत संरक्षण विभागातर्फे कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग सहभागी झाल्या होत्या. काल पाकिस्ताननं उत्तर आणि पश्चिम भारतातल्या अनेक लष्करी तळांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्रांद्वारे हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय सैन्यानं तो निष्प्रभ ठरवला, असं कर्नल कुरेशी यांनी सांगितलं.

**<u>पंतप्रधान-उच्चस्तरीय बैठक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल विविध मंत्रालयांच्या आणि विभागांच्या सचिवांसोबत एक उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत राष्ट्रीय सुरक्षेबाबतच्या सध्याच्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय सज्जता आणि आंतरमंत्रालयीन समन्वयाचा आढावा घेण्यात आला. सर्व मंत्रालयं आणि यंत्रणांमध्ये कार्यवाहीतील सातत्य आणि लवचिकता कायम राखण्यासाठी त्यांच्यात अखंड समन्वय असणं गरजेचं आहे, असं मोदी यावेळी म्हणाले. स्थानिक स्वराज्य संस्थांसह राज्यांसोबतही योग्य समन्वय राखावा, असा सल्ला यावेळी सर्व मंत्रालयांना देण्यात आला. सध्याच्या संवेदनशील काळात सतत सतर्क राहा, संस्थात्मक समन्वय आणि सुसंवाद राखा असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. राष्ट्रीय सुरक्षा, सज्जता आणि नागरिकांच्या सुरक्षेप्रती सरकार कटीबद्ध आहे असं मोदी यांनी सांगितलं.

**<u>सर्वपक्षीय बैठक</u>**

'ऑपरेशन सिंदूर'बाबत विरोधी पक्षांना माहिती देण्यासाठी काल नवी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत सर्वच नेत्यांनी भारतीय सैन्याच्या शौर्याची प्रशंसा केली तसंच सरकारला संपूर्ण पाठिंबा असल्याचं सांगितलं. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बैठकीनंतर माध्यमांच्या प्रतिनिधींना ही माहिती दिली.

केंद्रिय मंत्री अमित शहा, डॉक्टर एस. जयशंकर यांच्यासह काँग्रेस नेते राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे आणि बीजेडी, एआयएमआयएम, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, द्रमुक, एलजेपी, टीडीपी, संयुक्त जनता दल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रीय जनता दल इत्यादी पक्षांच्या नेत्यांसह प्रफुल्ल पटेल, सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे, संजय राऊत हे राज्यातले नेते उपस्थित होते.

**<u>संरक्षण प्रणाली</u>**

भारतीय संरक्षण दलानं काल सकाळी पाकिस्तानच्या हवाई संरक्षण प्रणालीवर हल्ला केला. यात लाहोर इथली संरक्षण प्रणाली नष्ट झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. भारत पाकिस्तानला जशास तसं उत्तर देत आहे, असंही संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**विमानतळ**

पाकिस्तानच्या कुरपतींच्या पार्श्वभूमीवर किशनगड, भुंतर आणि लुधियाना विमानतळ बंद करण्यात आले आहेत. यापूर्वी राजस्थान, पंजाब, जम्मू-काश्मीर, चंदीगड आणि हिमाचल प्रदेशसह अनेक विमानतळांचं कामकाज स्थगित करण्यात आलं होतं.

**रजा**

भारत पाकिस्तानदरम्यान सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर दिल्ली सरकारनं आपल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सर्व रजा पुढील आदेशापर्यंत रद्द केल्या आहेत. हा निर्णय सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आणि आपत्ती प्रतिसाद प्रणालीची तयारी सुनिश्चित करण्याच्या आवश्यकतेनुसार घेतला गेला असल्याचं याबाबतच्या अधिकृत आदेशात म्हटलं आहे.

**पोप**

अमेरिकेचे रॉबर्ट फ्रांसिस प्रिवोस्ट यांची नवे पोप म्हणून निवड झाली आहे. कॅथोलिक चर्चच्या इतिहासात पोप बनलेले ते पहिले अमेरिकन व्यक्ती आहेत. नवे पोप लियो चौदावे या नावाने ओळखले जातील. काल सिस्टीन चॅपेलमध्ये झालेल्या मतदानानंतर हा निर्णय जाहीर करण्यात आला.

**करार**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काल रात्री ब्रिटनबरोबर एक महत्त्वपूर्ण व्यापार करार जाहीर केला. या करारात काही ब्रिटिश गाड्यांवरील आयात कर कमी करणं आणि काही स्टील आणि अल्युमिनियमच्या टॅरिफ-मुक्त आयातीचा समावेश आहे, तरीही बहुतेक ब्रिटिश वस्तूंवर दहा टक्के आयात शुल्क अद्याप लागू आहे. ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी ट्रम्प यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला आणि ही घोषणा केली.

यानंतर प्रसिद्ध केलेल्या एका संयुक्त व्हिडिओमध्ये स्टार्मर यांनी कार उत्पादक आणि स्टील उत्पादकांसाठी संरक्षण दिलं गेलं असल्यामुळे या कराराचं 'अत्युत्कृष्ट' आणि 'ऐतिहासिक' असं वर्णन केलं आहे. तर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कराराला उभय देशांमधील संबंध मजबूत करण्याच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल असं म्हटलं आहे.

**आर बी आय**

कॉर्पोरेट कर्जरोख्यांमध्ये सामान्य मार्गाद्वारे गुंतवणूक करणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेनं नियम शिथिल केले आहेत. या गुंतवणूकदारांना आता अल्पकालिक गुंतवणूक आणि केंद्रित मर्यादांचं पालन करणं आवश्यक राहणार नाही, असं बँकेनं आपल्या नव्या नियमावलीत म्हटलं आहे. तात्काळ प्रभावानं लागू करण्यात आलेल्या या निर्णयाचा उद्देश विदेशी गुंतवणूकदारांसाठी गुंतवणुकीकरता अधिक सुलभता प्रदान करण्याचा आहे.

**मिस वर्ल्ड**

तेलंगणमध्ये उद्यापासून मिस वर्ल्ड स्पर्धा सुरू होत असून उद्याच्या भव्य उद्घाटन सोहळ्यासाठी तेलंगण सरकारकडून कसून तयारी सुरू आहे. ही जागतिक स्पर्धा हैद्राबादमधील गाचीबोवली इथल्या मैदानात होणार आहे. त्यासाठी जगभरातील 109 देशांतील स्पर्धक हैद्राबादमध्ये आले आहेत, तर काही स्पर्धकआज पोहोचणार आहेत. हैद्राबाद जवळचं आंतरराष्ट्रीय विमानतळ या निमित्तानं सजविण्यात आलं आहे, ही स्पर्धा या महिन्याच्या 31 तारखेपर्यंत चालणार आहे. स्पर्धकांनी काल सरावात भाग घेतला आणि आजही तो चालू राहणार आहे. या स्पर्धक राज्यातील ऐतिहासिक आणि इतर पर्यटन स्थळांना भेट देणार असून कर्करोगासारख्या इतर गोष्टींबाबत जागरूकता वाढवण्यासाठी इतर कार्यक्रमांमध्येही सहभागी होणार असल्याचं आयोजकांनी म्हटलं आहे.

**खेलो इंडिया**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत काल महाराष्ट्रानं पदकांचं अर्धशतक पूर्ण करत पदकतालिकेतलं आपलं अव्वल स्थान कायम राखलं. या स्पर्धेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी 21 सुवर्ण, 18 रौप्य आणि 16 कास्य अशी एकंदर 55 पदकं पटकावली आहेत. काल संपलेल्या सायकलिंग आणि मल्लखांब स्पर्धेची महाराष्ट्राने सुवर्ण सांगता केली. सायकलिंग स्पर्धेत 3 सुवर्ण 2 रौप्य आणि 1 कास्य पदकं मिळवत महाराष्ट्राने उपविजेतेपद पटकावलं. मल्लखांब स्पर्धेत 2 सुवर्ण 5 रौप्य आणि 2 कास्य अशी 9 पदकं कमवून महाराष्ट्रानं उपविजेतेपदावर नाव कोरलं. जलतरणात सर्वाधिक 19 पदकं महाराष्ट्रानं जिंकली आहेत. तिरंदाजीमध्ये 6 सुवर्ण पदकांसह 9 पदकांची विक्रमी कामगिरी महाराष्ट्रानं केली आहे. कबड्डीमध्ये महाराष्ट्र संघानं रौप्य पदक मिळवलं.

**आयपीएल**

भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आय पी एल क्रिकेट स्पर्धेतील धरमशाला इथं होणारा पंजाब किंग्ज आणि दिल्ली कॅपीटल्स यांच्यातला कालचा सामना रद्द करण्यात आला. दरम्यान पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात येत्या रविवारी धरमशाला इथं नियोजित असलेला सामना आता अहमदाबाद इथं खेळला जाणार आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.